“मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेची” परिणामकारक अंमलबजावणी होण्याकरीता सुधारणा.

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: सौरप्र-२०१८/प्र.क्र.२६/ऊर्जा-७.**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**
**दिनांक: १७ मार्च, २०१८.**

**संदर्भ**:- १) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र.सौरप्र-२०१६/प्र.क्र.४९/ऊर्जा-७, दिनांक १४ जुन, २०१७.
२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. जमीन-२०१७/प्र..क्र.१९७/ज-१, दि.२९ नोव्हेंबर, २०१७
३) अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महानिर्मिती यांचे पत्र क्र. सीई/एसपीजीडी - पी/जी आर /कृषी फिडर/सुधारणा/००३८६, दि.१० जानेवारी, २०१८
४) अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महावितरण यांचे पत्र क्र.एमईएसडीसीएल/पीपी/सोलर एजी फिडर/ ००१००४ दि. १२ जानेवारी, २०१८
५) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र.सौरप्र-२०१८/प्र.क्र.८७/ऊर्जा-७, दिनांक २७ फेब्रुवारी, २०१८.

**प्रस्तावना :-**

राज्यातील ज्या ग्रामीण भागामध्ये गावठाण व कृषी वाहिनी विलगीकरण झाले आहे अशा ठिकाणच्या कृषी वाहिनी सौर ऊर्जाद्वारे विद्युतीकरण केल्यास पारंपारिक विजेची मोठ्या प्रमाणात बचत होऊ शकते. अशा बचत झालेल्या वीजेचा वापर इतर उत्पादनक्षम कामांसाठी होऊ शकत, परिणामी महावितरण कंपनीचा वीजेच्या खरेदीवर होणारा खर्च कमी होईल व पारंपारिक वीजेची बचत होईल. तसेच महावितरण कंपनीच्या महसूलात वाढ होण्यास मदत होईल आणि वाणिज्यिक व औद्योगिक ग्राहकांसाठी वीजेचा दर कमी राखण्यासही मदत होईल. या सर्व बाबी तसेच राज्यातील शेतकऱ्यांना माफक दरात व त्यांच्या सोयीनुसार वीज पुरवठा उपलब्ध व्हावा या दृष्टिकोनातून राज्यात सौर कृषी वाहिनी योजना सुरू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये राज्यात “मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना” लागू करण्यात आली. सदर योजनेअंतर्गत राळेगणसिध्दी, जि. अहमदनगर व कोळंबी, जि. यवतमाळ येथे पथदर्शी प्रकल्प मंजुर करण्यात आले आहेत. सदर प्रकल्पांची अंमलबजावणी/ कार्यन्वयन करताना काही अडचणी अंमलबजावणी यंत्रणा व त्यास सहाय्यभूत असणाऱ्या पुरक यंत्रणांच्या निदर्शनास आल्या. योजनेच्या शासन निर्णयात अनु.क्र. २३ येथे या योजनेची अंमलबजावणी योग्य रितीने होण्याच्या दृष्टीने प्रधान सचिव (ऊर्जा) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली असून त्याबाबतचा शासन

निर्णय संदर्भाधीन अनु. क्र. ५ नुसार निर्गमित करण्यात आला आहे. योजनेचा व त्याअंतर्गत मंजुर प्रकल्पाचा वेळोवेळी विभागाव्दारे आढावा घेण्यात आला असून त्यात प्रामुख्याने काही बाबी, योजना गतिमान व परिणामकारक अंमलात आणण्याच्या दृष्टीने, आवश्यक वाटल्या आहेत. अशा अडचणींबाबत महानिर्मिती /महावितरण/महाऊर्जा यांनी योजनेत सुचविलेले बदल/सुधारणा समितीव्दारा विचारात घेण्यात येऊन योजनेची गतीने व परिणामकारक अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णय दि. १४ जुन, २०१७ मध्ये सुधारणा/बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**<u>शासन निर्णय</u> :-**

"मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना" या योजनेची अंमलबजावणी करताना उदभवणाऱ्या/ येणाऱ्या अडचणींबाबत महानिर्मिती /महावितरण/महाऊर्जा यांनी वेळोवेळी निदर्शनास आणलेले, सुचविलेले बदल लक्षात घेता, संदर्भाधीन क्र. ५ येथील शासन निर्णयानुसार गठीत समितीने केलेल्या शिफारशींनुसार संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णय दि. १४ जुन, २०१७ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा/बदल करण्यात येत आहेत:-

१. राज्यातील ग्रामीण भागामधील सौर ऊर्जा प्रकल्पातून निर्माण होणारी वीज कृषी फिडरव्दारे शेतकऱ्यांना दिवसा उपलब्ध करून देण्यात येईल. यास महाराष्ट्र वीज नियामक आयोगाची मान्यता घेण्यात येईल.

२. सदरच्या योजनेस गतीमानता व अंमलबजावणीत लवचिकता येण्यासाठी प्रकल्पपरत्वे महानिर्मिती कंपनी या अंमलबजावणी यंत्रणेव्यतिरिक्त महावितरण कंपनीस अंमलबजावणी यंत्रणा म्हणून घोषीत करण्यात येत आहे. सदर योजनेच्या अंमलबजावणीच्या टप्प्यामध्ये त्या त्या विवक्षित ठिकाणी महाऊर्जा तसेच महानिर्मिती/महापारेषण/ महावितरण या कंपन्यांचाही सहभाग असेल.

३. अंमलबजावणी यंत्रणेव्दारे राज्यातील ११ के.व्ही. ते १३२ के.व्ही. वीज उपकेंद्राच्या २ कि.मी. ते ३ कि.मी. (अपवादात्मक परिस्थितीत ५ कि.मी.) परीघातील शासकीय जमीन उपलब्धतेचा शोध घेण्यात येईल. तसेच सदर ठिकाणी असलेल्या वीज उपकेंद्राची क्षमता आणि शासकीय जमीनीची उपलब्धता व जमिनीचा महत्तम वापर होण्याच्या दृष्टीने वीज निर्मितीची क्षमता विचारात घेऊन, सौर कृषी वाहिनी प्रकल्पाची निवड करण्यात येईल. तत्पूर्वी त्याबाबत आवश्यकतेनुसार महाऊर्जा/ महानिर्मिती/ महापारेषण/महावितरण कंपनी यांच्यासमवेत समन्वय राखून अशा प्रकल्पाच्या प्राथमिक व्यवहार्यतेबद्दल त्यांच्याकडून मान्यता अंमलबजावणी यंत्रणा घेईल. विविध टप्प्यात या कंपन्यांचे सुचविलेले अभिप्राय सम्मिलित करून घेतील.

४. सौर कृषी वाहिनी योजनेच्या प्रकल्पाकरिता निश्चित केलेली शासकीय जमीन ३० वर्षाच्या कालावधीकरिता नाममात्र रू.१/- या दराने भाडेपट्टीने त्या त्या विभागाच्या व महसूल विभागाच्या मान्यतेने उपलब्ध करण्यासाठी स्वतंत्रपणे धोरणात्मक व सविस्तर आदेश महसूल विभागाकडून संदर्भ क्र. २ येथे नमूद केल्यानुसार निर्गमित करण्यात आले आहेत. त्यात महानिर्मितीसह योजनेकरीता

अंमलबजावणी यंत्रणा म्हणून घोषीत करण्यात येणाऱ्या यंत्रणेस जमिन भाडेपटयाने उपलब्ध करण्याबाबत बदल करण्यात येतील. अशी जमिन महसूल विभाग अंमलबजावणी यंत्रणेस ३० वर्षाच्या भाडेपटयाने देईल. त्यानुसार करारनाम्यात योग्य अटी व शर्ती नमुद करण्यात येतील. सौर ऊर्जा प्रकल्पासाठी खाजगी जमिनधारकही आपली पडिक जमिन भाडेकराराने (Lease Basis) देऊ शकतील. याबाबतच्या भाडेपटयाचा दर अंमलबजावणी यंत्रणेव्दारे निश्चित करण्यात येईल.गायरान जमिनी जिल्हाधिकारी यांच्याकडून मिळविण्यात येतील.

५. सौर कृषि वाहिनीला उपलब्ध करुन देण्यात येणारी जमीन अकृषिक (NA) करण्याची गरज राहणार नाही. अंमलबजावणी यंत्रणा योजनेअंतर्गत अंतिम करण्यात येणाऱ्या प्रकल्पांची नोंदणी प्रथम महाऊर्जाकडे करतील व त्याकरिता महाऊर्जा कोणतेही शुल्क आकारणार नाही.

६. प्रकल्पाची प्राथमिक व्यवहार्यता निश्चित झाल्यावर अंमलबजावणी यंत्रणेव्दारे PPP (Public-Private Partnership) तत्वावर विहीत कार्यपध्दतीने पारदर्शक व स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया वा उलट बोली (Competitive Bidding/ERA) राबवून खाजगी गुंतवणूकदाराची निवड करण्यात येईल. Bidding Cap निश्चित करताना प्रधान सचिव (ऊर्जा) यांच्या अध्यक्षतेखाली समितीची मान्यता घ्यावी. स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया वा उलट बोली ( Competitive Bidding Process/ERA)साठी केंद्र शासन/महाराष्ट्र शासन/महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांचे मार्गदर्शक तत्वे विचारात घेण्यात येतील.

७. प्रस्तावित ठिकाणी खाजगी गुंतवणूकदाराकडून सौर कृषी वाहिनी प्रकल्प उभारण्यासाठी अंमजलबजावणी यंत्रणेकडून योग्य तो करार २५ वर्षाच्या अथवा विवक्षित कालावधीकरिता करण्यात येईल. त्यामध्ये वीज खरेदी करार (PPA) व त्याबाबतच्या अटी व शर्तींचा समावेश असेल. विकासकाकडून खरेदी केलेली वीज अंमलबजावणी यंत्रणा जर महानिर्मिती कंपनी असल्यास ती महावितरण कंपनीला विक्री करेल. अशी वीज महावितरण कंपनीला विक्री करताना त्यात महानिर्मिती कंपनीस अशा वीजेसाठी येणाऱ्या व्यवस्थापन खर्चाचा समावेश करून त्याप्रमाणे महानिर्मिती कंपनी व महावितरण कंपनी यांच्यात वीज विक्री करार (Power Sale Agreement) करण्यात येईल. अशा वीज खरेदी/विक्री करारास (PPA/PSA) व व्यवस्थापन खर्चास महानिर्मिती/महावितरण कंपनीकडून महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाची मान्यता घेण्यात येईल. महावितरण कंपनीव्दारा राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांमध्ये वीज विक्री करारास महावितरण कंपनी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाची मान्यता घेईल. अंमलबजावणी यंत्रणेव्दारे करण्यात येणाऱ्या सर्व करारामध्ये शासनाचे हित जपण्याची दक्षता घेण्याची जबाबदारी अंमलबजावणी यंत्रणेची राहील.

८. प्रकल्पाची निवड करताना जागा अधिग्रहीत करण्यासाठी होणारा खर्च, विकास शुल्क, निष्कासनाचा खर्च आणि खाजगी गुंतवणूकदारांचा दर हा सगळा खर्च एकत्रितपणे विचारात घेऊन अंतिम वीजेचा दर निश्चित झाल्यानंतर अंतिम दरास महावितरणची मान्यता घेऊन प्रकल्पाची व्यवहार्यता निश्चित करण्यात यावी.

९. खाजगी गुंतवणूकदारांकडून सदर प्रकल्पाची उभारणी व त्याची देखभाल-दुरूस्ती अंमलबजावणी यंत्रणे समवेत केलेल्या करारात नमूद केल्याप्रमाणे २५ वर्षाच्या अथवा विवक्षित कालावधीसाठी करण्यात येईल.

१०. या योजने अंतर्गत निवड झालेला सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी सर्व मुलभूत/पायाभूत सुविधांचा खर्च विकासकाव्दारे करण्यात येईल. वीजेच्या निष्कासनाचा खर्च हा महाऊर्जाव्दारे हरित ऊर्जा निधीतून प्रकरणपरत्वे अंमलबजावणी यंत्रणेला अदा करण्यात येइल. अंमलबजावणी यंत्रणेस निष्कासनाचा खर्चही विकासकाकडून करण्याबाबतची अट करारात टाकण्याची मुभा असेल.

११. अशा योजने अंतर्गत आस्थापित झालेला प्रकल्प महावितरण कंपनीच्या वीज प्रणालीला (पारेषण संलग्न) जोडण्यात येईल व सदर वीज वितरण वाहिनीची देखभाल व दुरूस्ती महावितरण कंपनीकडून करण्यात येईल.

१२. सदर सौर कृषी वाहिनीमधील कृषी ग्राहकांच्याकडून वीज वितरण झालेल्या वीजेच्या पुरवठ्यापोटी बिलाची वसुली महावितरण कंपनीकडून वा महावितरण कंपनीने निश्चित/निवड केलेल्या वितरण फ्रेंचायझी कडून करण्यात येईल.

१३. अशा ठिकाणी त्या कृषी ग्राहकांना वीज मिटर जोडलेले नसल्यास ते महावितरण कंपनीकडून जोडण्यात येतील.

१४. सदर प्रकल्पामधून निर्माण होणारी संपूर्ण वीज विद्युत प्रणालीमध्ये निष्कासित करण्यात येईल. अशा संपूर्ण वीजेपोटी प्रसंगानुरूप अंमलबजावणी यंत्रणा असणाऱ्या महावितरण कंपनीकडून अथवा महानिर्मिती कंपनीकडून विकासकास बील अदा करण्यात येईल.

१५. एक किंवा अनेक शेतकरी यांनी सहकारी संस्था स्थापन करून खाजगी गुंतवणूक मिळवून अशा संस्था वा स्थानिक स्वराज्य संस्था सौर कृषी वाहिनी प्रकल्प उभारण्यासाठी अंमलबजावणी यंत्रणेकडे प्रस्ताव सादर करू शकतील. सदर संस्थांनांही स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया / उलट बोली मध्ये भाग घ्यावा लागेल. निवड झाल्यास अंमलबजावणी यंत्रणाशी यथोचित करार करून योजनेत सहभागी होऊ शकतील. अशा प्रकल्पातून संबंधित संस्थेच्या लाभार्थी शेतकऱ्यांना वीज पुरवठा करता येईल.

१६. सदर सुधारणेच्या अनुषंगाने संदर्भ क्र. १ येथील नमूद शासन निर्णयातील अनुषंगिक तरतुदी/ कार्यपध्दती सुधारण्यात आल्या आहेत. याबाबत साशंकता असल्यास त्याबाबत प्रधान सचिव (ऊर्जा) यांच्या अध्यक्षतेखालील दिनांक २७ फेब्रुवारी, २०१८ च्या शासन निर्णयाव्दारे गठीत समितीव्दारे घेण्यात आलेला निर्णय अंतिम असेल.

१७. हा शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०३१७१२२११३६४१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Prashant Pundalik Badgeri

Digitally signed by Prashant Pundalik Badgeri
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industry Energy And Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ae61ab0caff4e0f24ac492ed7902d55ccf49e93124a5c1327133a6da9db8c748, serialNumber=ec955e2d360e1fddb6abac58a907419053beeceb5dbac48a78c89c588ff71bef, cn=Prashant Pundalik Badgeri
Date: 2018.03.17 12:22:39 +05'30'

**( प्र.पुं.बडगेरी )**

उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई,
२) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३) सर्व मंत्री / सर्व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मुंबई,
४) विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधान परिषद, विधान भवन मुंबई,
५) सर्व विधानमंडळ सदस्य,विधान भवन, मुंबई,
६) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
७) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
८) प्रधान सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
९) प्रधान सचिव (महसूल ), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१०) प्रधान सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई,
११) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव यांचे स्वीय सहायक,सर्व मंत्रालयीन विभाग,
१२) सर्व विभागीय आयुक्त,
१३) सर्व जिल्हाधिकारी,
१४) मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषदा,
१५) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर,
१६) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई १/२
१७) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, नागपूर १/२
१८) सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई (पत्राने),
१९) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, सूत्रधार कंपनी मर्या.,मुंबई,
१९) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.,मुंबई,
२०) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्या.,मुंबई,
२१) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्या.,मुंबई,
२२) महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा),पुणे,
२३) उप सचिव/ ऊर्जा-३, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई,
२४) ऊर्जा उप विभागातील सर्व कार्यासने,उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई,
२५ निवड नस्ती,ऊर्जा-७, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.